## एका महाराजाचा अस्त्

रविवार २० नोव्हेंबर २०१२ हा दिवस निसर्गप्रेमी, मुख्यत्वेकरुन व्याघ्रप्रेमींसाठी अतिशय कष्टप्रद होता. त्या दिवशी रात्रीच्या सुमारास $B_2$ या बांधवगडच्या अत्यंत मोठया, प्रसिद्ध वाघाचा अंत झाला. गेली १० वर्षे या जंगलातून मुक्तपणे वावरणाऱ्या या अनभिषिक्त सम्राटचा अंत खचितच चटका लावणारा आहे.

$B_2$ चा जन्म १९९७ चा या वर्षीच्या उन्हाळयात मोहिनी (बच्ची) वाघिणीने तीन नर वाघबछडयांना जन्म दिला. $B_2$ हा त्यातलाच एक छोटा बछडा ते जंगलाचा स्वामी होताना त्याने अनेक स्थित्यंतरे पाहिली. आपल्या आईकडून त्याने शिकारीच्या सर्व लकबी सराईतपणे शिकून घेतल्या. चुकांमधून हा बच्चा हळूहळू शिकत गेला.

बांधवगडच्या शुष्क पानगळीच्या रानावर ताबा मिळवण्यासाठी अनेक अग्निदिव्ये पार करावी लागली. याच जंगलात चार्जर तसेच स्वतःचा मोठा भाऊ $B_1$ यांसारखे तगडे प्रतिस्पर्धी होते. पण सन २००० साली चार्जर मेल्यावर त्याने बांधवगडमधले काही इलाखे पादाक्रांत केले. पुढे २००२ साली $B_1$ च्या अवैध शिकारीमुळे $B_2$ च्या स्वरुपात रानाला नवा स्वामी मिळाला.

हा मस्तवाल वाघ एखाद्या महाराजाप्रमाणे जंगलात वावरु लागला. त्याची डरकाळी किती थरकाप उडवणारी होती हे जी ज्यांनी ऐकली त्यांनाच कळेल. जवळपास सात वर्ष त्याला अन्य कुठल्याही नर वाघाची स्पर्धा नव्हती; इतका त्याचा जबरदस्त दरारा होता. अशाच त्याच्या गर्जना खोऱ्यात, किल्ला पायथ्याशी वर्षानुवर्षे घुमत होत्या. अनेक माद्यांशी त्याने या काळात मीलन केले व आपला वंश वाढवून टिकवायचे काम तो करत राहिला.

हळूहळू वृद्धत्वाकडे झुकू लागल्यावर २००९ मध्ये राजबेहरा (बोखा) नराने त्याला स्पर्धा निर्माण केली. पण तो ही या महाराजाच संस्थान खालसा करण्यात अपयशी ठरला. हो पण काही वाटा त्याने जरुर मिळवला. पुढे वयाच्या बाराव्या तेराव्या वर्षी मिर्चानी वाघिणीचा एक बछडा (कलुआ) व त्याच्या स्वतःच्याच् मुलाने त्याला टक्कर दिली. या वयातही तरुण कलुआला त्याने चांगलाच दणका दिला. जणू तो दर्शवीत होता, “बच्चू, अजुन तू लहान आहेस, माझ्याशी पंगा घेऊ नकोस.”

असेच काही दिवस उलटल्यावर राजबेहरा (बोखा) परत स्वतःच नशीब आजमावण्यासाठी $B_2$ वर चालून आला. यावेळेस मात्र $B_2$ कडील चक्रधारा मैदानाच्या काही भागात घुसखोरी केली. आणि $B_2$ ला माघार घ्यावी लागली. जंगल पर्यटनला चांगले दिवस आल्यापासून बांधवगडची ख्याती उत्तरोत्तर वाढतच गेली; ती वाघांच्या सहज होणाऱ्या दर्शनामुळे भारतातील जंगलामध्ये आज बांधवगडमध्येच वाघांची घनता सार्वाधिक आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये $B_2$ हा भारतातील सर्वात मोठया वाघांपैकी एक आणि त्याची छबी मिळावी म्हणून छायाचित्रकार सदैव धडपडतात असा होता; यात कोणालाही शंका नाही. तज्ञांच्या मताप्रमाणे त्याची लांबी अंमळ दहा फुटापेक्षाही जास्त होती. एका तपापेक्षा जास्त त्याने या जंगलावर राज्य केलं. ज्यांना बांधवगडाची भौगोलिक माहिती आहे त्यांना कल्पना येईल की त्याच संस्थान बामेरा ते ताला रेंज एवढ मोठ होत. पण सिद्धबाबा च्या पुढे तो कधीही गेला नाही.

पुढे १२ एप्रिल २०१० मध्ये बामेरा वाघाशी (त्याचाच मुलगा) त्याची लढत झाली आणि त्यात तो जबर जखमी झाला. पुढची दोन वर्ष आपल्या इलाख्यावर ताबा राखायचा त्याने प्रयत्न केला. कदाचित परत झालेल्या झुंजीत तो अजुनच जखमी झाला. त्याचे साम्राज्य ढासळू लागल्याची जाणीव त्यालाही झाली असावी.

त्यावेळचे बांधवगडचे मुख्य वनाधिकारी श्री. पाटील साहेबांनी सांगितले की तो रानाच्या बाहेर झालर क्षेत्रात आला होता. तिथे त्याने एका वनकर्मचाऱ्यावर हल्ला केला. त्याला साइट करुन पकडण्यात यश आले पण त्याच रात्री त्याने प्राण सोडले.

त्याची एक छबी मिळावी म्हणून लाखो जण प्रयत्न करत असत. त्याच्याइतकी प्रसिद्धी आजवर अन्य कुठल्याही वाघाला मिळाली नाही कदाचित २०१० च्या लढाईनंतर तो बरा व्हावा म्हणून अनेक जणांनी प्रार्थनाही केल्या होत्या. शेवटी survival of the fittest या तत्वानुसार सत्तांतर झाले. बामेराच्या रुपात बांधवगडला नवा राजा मिळाला. त्याच्या भारदार गर्जनांना आणि राजबिंडया रुपाला मात्र बांधवगड मुकल. वनातील वाघाचा मृत्यू हा असाच भीषण आणि निर्दय असतो.

**श्रीरंग फडके**